# द स्टोरी ऑफ माय लाईफ

**हेलन केलर**

अनुवाद

**मानसी काणे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**द स्टोरी ऑफ माय लाईफ :** हेलन केलर
अनुवाद : मानसी काणे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मानसी काणे
'मानस' बगला, नीलकंठ नगर
हरिपूर रोड, हरिपूर, सांगली - ४१६४१६
फोन नं. ०२३३ - २३३१५९९ मो. नं. : ९४२३८६८५९९

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ १७०/-

# द स्टोरी ऑफ माय लाईफ

द स्टोरी ऑफ माय लाईफ
द स्टोरी ऑफ माय लाईफ

# १

आत्मचरित्र लिहायचं म्हणजे मोठी अवघड गोष्ट आहे. जन्मापासूनच्या सगळ्या आठवणी एकमेकांत गुंतलेल्या असतात. तो गुंता सोडवणं, त्या आठवणी गोळा करणं, त्या सूत्रबध्द मांडणं, त्यांचं योग्य शब्दांकन करणं, कितीतरी गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळंच आयुष्याचा इतिहास लिहायला सुरुवात करताना मला थोडीशी भीती वाटतेय. माझ्या बालपणीच्या काळावर सोनेरी धुक्यासारखा पारदर्शक पडदा पडलेला आहे. आठवणींनी त्या पडद्यामागे गर्दी केलेय आणि तो पडदा उघडताना, मला उगाचच संकोचल्यासारखं झालंय. मी माझी अगदी सुरुवातीची आयुष्याबद्दलची मतं जेव्हा पडताळून पाहण्याचा प्रयत्न करू लागते, तेव्हा मला समजतं की, काही वर्षांनंतर सत्य आणि कल्पना दोन्ही एकसारखं वाटू लागतं. कदाचित काळातलं हे अंतरच भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडत असावं. आई आणि मुलाचं नातं अनोखं असतं. मुलाला जे वाटतं, त्याचं चित्र आई आपल्या कल्पनेत रंगवत असते. अर्थात इतरांचे अनुभव माझ्या बालपणापेक्षा अगदी वेगळे आहेत.

लहानपणातली सुखदुःखं आता तितकीशी काटेरी राहिली नाहीत. माझ्या प्राथमिक शिक्षणाच्या वेळी घडलेल्या काही महत्त्वाच्या घटनासुध्दा आता विस्मृतीत गेल्या आहेत. त्या सांगताना मला आणि तुम्हाला कंटाळा येऊ नये, यासाठी मला मनोरंजक वाटलेल्या आणि महत्त्वाच्या काही प्रसंगांचं अगदी संक्षिप्त वर्णन घटनांच्या क्रमानुसार करण्याचा मी प्रयत्न केला आहे. माझा जन्म २७ जून १८८० मध्ये उत्तर अल्बामामधील टसकंबया नावाच्या छोट्याशा शहरात झाला.

माझं आजोळ म्हणजे वडिलांच्याकडचं घराणं कास्पर कीलर यांच्यापैकी होतं. ते मूळचे स्वित्झर्लंडचे; पण आता मेरीलँडमध्ये स्थायिक झाले होते. माझ्या स्विस पूर्वजांपैकी एकजण झुरीचमध्ये कर्णबधिरांचे पहिले शिक्षक होते. त्यांच्या शिक्षणासंबंधी त्यांनी एक पुस्तकही लिहिलं होतं. खरं तर हा एक योगायोग म्हणावा लागेल. अर्थात ज्याच्या पूर्वजांपैकी कोणी सेवक नाही, असा राजा नाही आणि ज्याच्या पूर्वजांपैकी कोणी राजा नाही असा सेवकही नाही, हे अगदी खरं आहे.

माझे आजोबा कास्पर कीलर यांनी अल्बामामध्ये खूप मोठी जमीन घेतली होती आणि अखेर ते तिथे स्थायिक झाले. मला सांगितलं गेलं आहे की, ते बागकामाचं साहित्य खरेदी करण्यासाठी वर्षातून एकदा घोड्यावरून टसकंबयाहून फिलाडेल्फियाला जात असत. त्यांच्या कुटुंबियांची लिहिलेली खूप पत्रं माझ्या आत्याकडे आहेत. जुनी पत्रं म्हणजे जुन्या आठवणींचं संचित असतं. भूतकाळाशी जोडणारा तो दुवा असतो. या पत्रांमध्ये त्यांच्या या प्रवासाचं अगदी सुरस वर्णन वाचायला मिळतं. वेगवेगळ्या अनुभवांची चित्रविचित्र माहिती मिळते.

माझी आजी केलर म्हणजे लाफाईटचे असिस्टंट ऑफिसर अलेक्झांडर मूर यांची मुलगी आणि व्हर्जिनियाचे वसाहतीसंबंधीचे गव्हर्नर स्पॉटसवुड यांची नात होती. रॉबर्ट–ई–ली यांची ती मामेबहीण होती. आजीचे बरेचसे नातेवाईक मोठमोठ्या पदावर काम करीत होते.

माझे वडील ऑर्थर–एच–केलर कॉन्फेडरेट आर्मीमध्ये कॅप्टन होते. माझी आई केट एडम्स ही त्यांची दुसरी पत्नी होती. दोघांच्या वयात खूप अंतर होतं. माझी आई त्यांच्यापेक्षा वयाने खूपच लहान होती. तिचे आजोबा बेंजामिन एडम्स यांनी सुसन्ना ई गुडहयूबरोबर लग्न केलं होतं. ते खूप वर्षं न्यूबरीपोर्ट मेसाच्युएटस इथं राहत असत. त्यांचा मुलगा चार्ल्स एडम्सचा जन्म तिथंच झाला. त्यानंतर ते तिथून हेलेना आणि अर्कान्साला गेले. देशात युध्द सुरू झाल्यावर ते दक्षिणेकडून लढले आणि ब्रिगेडियर जनरल झाले. त्यांचा विवाह लूसी हेलन एवरेट हिच्याशी झाला होता. एडवर्ड एवरेट आणि डॉ. एडवर्ड एवरेट हेल आणि लूसीचा परिवार यांचं नातं होतं. युध्द संपल्यानंतर त्यांचं कुटुंब मेमफिस टेनेसी इथं स्थलांतरित झालं.

मी एकदा खूप आजारी पडले होते. त्या भयानक आजारानेच माझी दृष्टी आणि श्रवणशक्ती हिरावून घेतली. हे सगळं होईपर्यंत मी एका छोट्याशा घरात राहत होते. त्यातली एक खोली मोठी प्रशस्त आणि चौकोनी होती. दुसरी खोली छोटी होती. तिथे आमचा नोकर झोपत असे. दक्षिणेकडं मोठ्या घराजवळ एक छोटंसं घर बांधण्याची प्रथा आहे. आऊट हाऊस म्हणाना. गरज पडली तर त्याचा उपयोग व्हावा, हा त्यामागचा हेतू असावा. माझ्या वडिलांनीसुध्दा युध्द संपल्यावर एक घर बांधलं. माझ्या आईशी लग्न झाल्यावर, ते त्या घरी राहायला गेले. फार सुंदर होते ते घर. हिरव्यागार झुडपांनी, रंगीबेरंगी गुलाब आणि फुललेल्या कमानदार वेलींनी लपेटलेलं होतं. बागेतून घराकडे पाहिलं की, एखाद्या लताकुंजासारखंच दिसायचं ते. तिथली छोटीशी पडवी पिवळ्या गुलाबांच्या आणि फुललेल्या सुंदर वेलींच्या आड लपलेली असायची आणि तिथं छोट्या छोट्या पांढऱ्याशुभ्र पक्ष्यांची आणि मधमाशांची जत्राच भरायची. फार छान होतं ते सगळं.

केलर लोकांचं घर. जिथं माझ कुटुंब राहायचं. घरापासून काही पावलांच्या अंतरावर गुलाबांच्या झाडांचा एक छोटासा मंडप होता. त्याला आइवी ग्रीन असे म्हणत असत. कारण घर, आसपासची झाडं आणि परिसरातले वाडे हिरव्यागार गारवेलींनी झाकलेले होते. जुन्या प्रकारची ती बाग म्हणजे माझ्या लहानपणीचा स्वर्गच होता. माझं बालपण अशा निसर्गरम्य सुंदर वातावरणात गेलं. मी खरंच नशीबवान आहे. माझे शिक्षक येण्यापूर्वी म्हणजे माझे शिक्षण सुरू होण्यापूर्वीसुध्दा मी चोहोबाजूंनी पसरलेल्या झाडांना स्पर्श करीत चालत राही. केवळ वासावरून मी कृष्णकमळ आणि लाल कमळ यातला फरक ओळखत असे. मला राग आला किंवा चीड आणणारी एखादी गोष्ट घडली की, त्यानंतर मन शांत करण्यासाठी मी बागेत जात असे. रागानं लाल झालेला माझा तप्त चेहरा, मी थंडगार पानात किंवा हिरव्यागार गवतात लपवत असे. राग शांत करायला निसर्गाच्या जवळ जाण्याइतका दुसरा चांगला उपाय मला सापडत नसे. त्या पुष्पवाटिकेत स्वच्छंदपणे फिरताना मला अतीव आनंद होत असे. त्या आनंदातच मी सगळ्या बागेत मजेत बागडत राही. कधी कधी अचानक एखाद्या सुंदर पुष्पभारात लावलेल्या वेलीची माझ्याशी गळाभेट होई. तिची पानं आणि मोहोरावरून

मी तिचं नाव ओळखे. मला माहीत होतं की, ही वेल उद्यानातल्या अगदी कडेच्या टोकाला असणाऱ्या मोडकळीला आलेल्या ग्रीष्मकालीन घरावर पसरली आहे. त्या वेलीत ते जीर्ण घर झाकून गेलं आहे. इथल्या जमिनीवर छोट्या छोट्या पानांची गोकर्णीसारखी वेल पसरली होती. वर चमेलीच्या वेलीचं तोरण लटकलेलं होतं. बटरफ्लाय लिलीची काही फुलं फुलली होती. या फुलांच्या पाकळ्या फुलपाखरांच्या पंखासारख्या मृदू आणि कोमल असतात. म्हणून त्यांना बटरफ्लाय लिली म्हणतात आणि गुलाब...त्यांची तर बातच न्यारी. फुलांचा राजाच तो. सर्वात सुंदर. अप्रतिम. मी उत्तरेकडच्या हरितगृहात माझ्या दक्षिणेतल्या घरातल्यासारखे सुंदर आणि मनमोहक गुलाब कधीच पाहिले नाहीत. आमच्या घराच्या दाराजवळील मंडपावर सजावटीसाठी माळा लटकवलेल्या असत. तोरणे बांधलेली असत. त्यात दारातल्या गुलाबांचे सुंदर, टपोरे, रंगीबेरंगी घोस अडकवलेले असत. सगळ्या परिसरात त्यांचा सुगंध दरवळत असे. त्यात इतर कोणत्याही गोष्टींची सरमिसळ नसे. फक्त गुलाबांचा घमघमाट. सकाळी दवात न्हालेली गुलाबाची फुलं इतकी सुंदर, इतकी नाजूक आणि कोमल दिसत की, मला वाटे नंदनवनातली पारिजातकाची फुलंच आहेत ही.

माझं बालपण चारचौघांसारखंच अगदी सामान्य होतं. सगळ्या लहान मुलांचं बालपण असंच असत असेल. कुटुंबातलं मी पहिलं मूल. त्यामुळं सगळ्या कुटुंबात पहिल्या मुलाचं स्वागत जसं उदंड उत्साहात होत असेल, तसंच माझंही झालं. माझं नाव काय ठेवावं, यासाठी घरी सगळ्यांच्यात खूप चर्चा झाली. प्रत्येकाचं म्हणणं होतं, घरात जन्मलेल्या पहिल्या-वहिल्या बाळाचं नाव मुळीच साधंसुधं ठेवायचं नाही. अगदी खास ठेवायचं. प्रत्येकाचा तसा हट्टच होता. माझ्या बाबांनी आपल्या एका आदरणीय पूर्वजांचं 'माइंडेड कॅम्पबेल' यांचं नाव सुचवलं. बाबांच्या मनात त्यांच्याविषयी फार आदर होता. हे नाव सुचवल्यानंतर त्यांनी नामकरणाच्या पुढच्या चर्चेत भाग घ्यायला नकार दिला. माझ्या आईनं मात्र ही समस्या अगदी सहज सोडवली. तिनं सांगितलं की, तिच्या आईच्या नावावरून माझं नाव ठेवलं गेलं पाहिजे. माझ्या आजीचं नाव होतं 'हेलन एवरेट.' पण मला चर्चमध्ये घेऊन जाताना रस्त्यात बाबा ते नाव विसरले. साहजिकच होतं. कारण नावांच्या चर्चेत भाग घ्यायला त्यांनी आधीच नकार दिला होता.

जेव्हा पाद्रीबाबांनी त्यांना बाळाचं नाव काय ठेवायचं, असं विचारलं, तेव्हा त्यांना एवढंच आठवलं की, माझ्या आजीच्या नावावरून माझं नाव ठेवायचं ठरलं आहे. त्यामुळं त्यांनी आजीचं नाव सांगितलं. म्हणाले, बाळाचं नाव ठेवा 'हेलन एडम्स.'

त्यावेळी मी दुपट्यात गुंडाळलेली इटुकलीशी मुलगी होते म्हणे; पण त्या वेळीसुध्दा मी फार उत्सुक होते. आपलं ते खरं करण्याची वृत्ती होती. मला हवं तेच करण्याबाबत मी त्या वयापासूनच फार आग्रही होते म्हणे. इतर कोणी काही करताना दिसलं की, मी तेच करायचा हट्ट धरायची. फक्त सहा महिन्यांची असताना, मी 'हाऊ डू सी' म्हणायला शिकले होते. एक दिवस तर कमालच झाली. मी अगदी स्पष्ट शब्दांत 'टी, टी, टी,' असं म्हणत सगळ्यांचं लक्ष माझ्याकडे वेधून घेतलं. माझ्या त्या आजारपणानंतरसुध्दा एक शब्द माझ्या लक्षात होता 'वॉटर.' माझी बोलण्याची शक्ती, माझी वाचा त्या भयानक आजारात अचानक नष्ट झाली. तरीसुध्दा 'वॉटर' या शब्दासाठी मी चित्रविचित्र आवाज काढत होते. मी जेव्हा शब्दांचं वर्णलेखन शिकले, तेव्हाच तो वाट्...वाट् असा चमत्कारिक आवाज काढणं मी बंद केलं.

सगळे मला सांगतात की, ज्या दिवशी मला एक वर्ष पूर्ण झालं, त्याच दिवशी मी चालायला सुरुवात केली. माझ्या आईनं मला आंघोळ घालून नुकतंच टबातून बाहेर काढलं होतं आणि आपल्या मांडीवर घेतलं होतं. इतक्यात माझं लक्ष पानांच्या हलत्या सावल्यांकडे गेलं. त्या सावल्या गुळगुळीत फरशीवर पडलेल्या उन्हात नाचत होत्या. ते दृश्य मला फारच आवडलं. मी आईच्या मांडीवरून उडी मारली आणि त्या सावल्यांकडे दुडुदुडु धावू लागले. पळण्याच्या भरात मी कशाला तरी अडखळून खाली पडले आणि रडू लागले. आईनं उचलून कडेवर घ्यावं म्हणून मी मोठमोठ्यांदा किंचाळू लागले.

पण आनंदाचे हे दिवस फारच थोडे होते. अल्पजीवी होते म्हणाना. वसंत ऋतू. ज्या काळात कोकिळा आणि मैनेची गाणी ऐकू येतात तो काळ. उन्हाळ्याचे दिवस; पण फार कडक उन्हाचे नव्हेत. यावेळी फळं आणि फुलं बहरलेली असतात. वातावरणात सुखावणारी ऊब असते. दुसरा असतो पानगळीचा मोसम. सोनेरी, किरमिजी रंगाची पानं सर्वत्र विखुरलेली असतात. या सगळ्या ऋतूंनी

आपल्याजवळच्या छान छान भेटी एका उत्कंठित, आनंदी बाळाला बहाल केल्या आणि मग फेब्रुवारीच्या त्या नीरस, कंटाळवाण्या दिवसात मला एका विचित्र आणि भयानक आजारानं अचानक घेरलं. बघता बघता माझी दृष्टी आणि श्रवणशक्ती हिरावून घेतली. जगात चैतन्यानं उसळू पाहात होते मी; पण माझं रूपांतर परत एका नवजात शिशूमध्ये झालं आणि मी बेशुध्द झाले. डॉक्टरांनी माझ्या पोटात आणि मस्तकात रक्तस्राव झाला असावा, असं निदान केलं. त्यांना वाटलं मी वाचणार नाही; पण एके दिवशी भल्या पहाटे माझा ताप अचानक उतरला. हे मोठं गूढच होतं. त्या सकाळी घरीदारी सर्वांनी आनंदी-आनंद साजरा केला; पण त्यावेळी कोणालाच अगदी डॉक्टरांनासुध्दा माहीत नव्हतं की, मी आता कधीच काही पाहू किंवा ऐकू शकणार नाही.

त्या आजाराच्या विलक्षण कटू आठवणी अजूनही मला चिकटून बसल्या आहेत. माझ्या वेदनामय आणि त्रासदायक अशा त्या काळात मी रडत असताना, तळमळत असताना माझी आई किती मायेनं, कोमलपणानं मला शांत करण्याचा प्रयत्न करत असे, ते आजही मला प्रकर्षानं आठवतं. मी हमसून हमसून रडत असे; पण ती मात्र शांतपणे आपल्या परीनं माझा त्रास कमी करण्याचा सतत प्रयत्न करीत असे. ती वेदना, ती भीती आजही मला स्पष्ट आठवते. वेदनेमुळं घाबरून, बेचैन होऊन मी मध्यरात्री जागी झाले होते. मला जरादेखील चैन पडत नव्हतं. झोप अर्धवट झाली होती. जाग आली आणि मी माझी शुष्क नजर भिंतीकडे वळवली. डोळ्यांची विलक्षण आग होत होती. प्रकाश मला फार आवडायचा; पण आता दिवसागणिक तो मंद होत होता. या क्षणभंगुर आठवणींखेरीजही आणखी काही आठवणी माझ्याकडे आहेत. ते सगळं मला एखाद्या विचित्र आणि भयानक स्वप्नासारखं वाटतं. हळूहळू त्या शांततेला आणि अंधाराला मी सरावले. तो काळाकभिन्न अंधार मला चोहोबाजूंनी वेढून बसला होता आणि एका ध्वनीविरहित जगात मी हरवले होते. मी आता आहे त्यापेक्षा वेगळी होते. मला हे सुंदर जग दिसत होते, सगळे आवाज ऐकू येत होते, हे काही काळानंतर मी विसरूनच गेले. माझी शिक्षिका मला भेटली नव्हती, तोपर्यंत माझी ही विस्मरणाची अवस्था कायम राहिली; पण माझ्या शिक्षिकेनं चमत्कार घडवला. माझ्या अंतरातल्या शक्तीला बंधमुक्त केलं. माझ्या आयुष्यातल्या पहिल्या